सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
(महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले)
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
विभागीय केंद्र ,अमरावती
व्ही.एम.व्ही ते वलगाव रोड, अमरावती-४४४६०४
दूरध्वनी क्र.(०७२१)२५३१४४५,फॅक्स क्र.२५३१४४ website: http://ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

जा.क्र.आरसीए. /२०१२/ ९०७४ दिनांक :- ५ / ६ / २०१२

प्रति,
मा.प्राचार्य / केंद्रासंयोजक
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
अभ्यासकेंद्र : कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा

**विषय :- अभ्यासकेंद्र मान्यतेबाबत .........**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पूर्वतयारी व बी.ए./बी.कॉम (मराठी माध्यम) शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र आपल्या संस्थेला चालविण्यास मान्यता मिळावी म्हणून विद्यापीठाकडे केलेल्या अर्जास अनुसरून मा.कुलगुरू व विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने आपल्या संस्थेस अभ्यासकेंद्र देण्याची शिफारस केलेली आहे.

आपणास कळविण्यात आनंद होतो की विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने आपल्या महाविद्यालयास/संस्थेस पूर्वतयारी व बी.ए./बी.कॉम.(मराठी मा)या शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र देण्यास तात्पुरती मान्यता दिलेली आहे. **अभिनंदन !** आपल्या केंद्राचा अभ्यासकेंद्र संकेतांक 13702 असा आहे. अभ्यासकेंद्राच्या निमित्ताने आपल्या महाविद्यालय / संस्थेशी विद्यापीठाचा ऋणानुबंध जोडला जात आहे याचा आम्हाला विशेष आनंद आहे.शिक्षणापासून वंचित असणा-यांचे भविष्य उज्वल करण्याच्या हेतूने ह्या अभ्यासकेंद्राच्या माध्यमातून स्वीकारलेल्या या कार्याबद्दल आपणास धन्यवाद! संस्थेतील पदाधिकारी आणि अभ्यासकेंद्रास देऊ केलेल्या आपल्या सहका-यांचे विद्यापीठाचे नूतन घटक या नात्याने स्वागत ! सामाजिक कार्याच्या दृष्टीने आपण स्वीकारलेल्या या उपक्रमास **हार्दिक शुभेच्छा!**

आपली अभ्यासकेंद्र चालविण्याची कार्यपद्धत आणि अभ्यासकेंद्रावरील प्रवेशसंख्या विचारात घेवून आपल्याला नंतर मुदत वाढवून देण्यात येईल.या पत्रासोबत जोडलेल्या अटी व शर्ती आपणास मान्य असल्यास रु. १००/ च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञा पत्र सादर करावे.

कळावे,

(Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik - 422 222)

आपला

(डॉ.के.एन.पाटील)
संचालक
विभागीय केंद्र,अमरावती

प्रत :- १) मा.संचालक,विद्यार्थी सेवा विभाग,
य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक
२) जिल्हा संचालक , य.च.म.मुक्त विद्यापीतचे जिल्हा केंद्र,
द्वारा: जीजामाता महाविद्यालय बुलढाणा
३) अध्यक्ष /सचिव, कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक- 422 222

दूरध्वनी – (0253)2231714, 2231715, 2230027


जा.क्र.यचममुवि/वि.से.वि./2018/ ३७३ दिनांक: ११/०६/२०१८

प्रति,

**मा. प्राचार्य,**

य. च. म. मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र

द्वारा- श्रीमती सिंधुताई जाधव आर्ट्स अँण्ड सायन्स कॉलेज,

ता. मेहेकर,

**जि. बुलढाणा** ४४४००१

**विषय: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे एम. ए. (मराठी, इंग्रजी), बी. लीब. शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत...**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना 1 जूलै 1989 रोजी महाराष्ट्र शासनाच्या कायद्यान्वये झालेली असून या विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त आहे.

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून 8 विभागीय केंद्रे आणि 2000 च्या वर अभ्यासकेद्रे कार्यरत आहेत. विद्यापीठाचे 125 च्या वर शिक्षणक्रम असून या शिक्षणक्रमासाठी दरवर्षी साधारणपणे 6.5 लाख विद्यार्थी प्रवेश घेत असतात. आपल्या संस्थेने / महाविद्यालयाने **मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे** विद्याशाखेच्या **एम. ए. (मराठी, इंग्रजी), बी. लीब.** शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी अभ्यासकेंद्र मिळावे यासाठी **अमरावती** विभागीय केंद्रावर अर्ज आणि अभ्यासकेंद्र प्रक्रिया शुल्क भरलेले होते.

आपल्या संस्थेने / महाविद्यालयाने अर्जामध्ये दिलेल्या तपशिलानुसार शैक्षणिक सुविधा, भौतिक सुविधा, शैक्षणिक व प्रशासकीय मनुष्यबळ आणि इतर सुविधा पाहण्यासाठी विद्यापीठाच्या एका समितीने आपल्या संस्थेला / महाविद्यालयाला आणि अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व सुविधांचे अवलोकन करून आपल्या संस्थेला / महाविद्यालयाला मुक्त विद्यापीठाचे **एम. ए. (मराठी, इंग्रजी), बी. लीब.** शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक **वर्ष २०१८-१९ ते २०२०-२०२१** या कालावधीसाठी 3 वर्षासाठी अभ्यासकेंद्र देणे बाबत शिफारस केलेली होती. सदर शिफारस संचालक, विद्यार्थी सेवा विभाग आणि संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा यांच्या शिफारशीसह अंतिम मान्यतेसाठी मा. कुलगुरू यांच्याकडे पाठविण्यात आलेली होती. मा. कुलगुरू यांनी आपल्या संस्था/ महाविद्यालयास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापाठाचे अभ्यासकेंद्र देण्यास मान्यता दिलेली आहे.

आपणांस कळविण्यात येते की आपल्या संस्था/ महाविद्यालयामध्ये य. च. म. मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष **२०१८-१९ ते २०२०-२०२१** पासून पुढील वर्षासाठी सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रांसाठी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हे केंद्रप्रमुख आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक हे केंद्र संयोजक म्हणून काम पाहतील. दैनंदिन कामासाठी सहायक, शिपाई यांची ही नेमणुक मुक्त विद्यापीठाच्या कामासाठी करण्यात यावी.
२. मुक्त विद्यापीठाच्या कामासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार मानधन देय राहील.
३. अभ्यासकेंद्र प्रमुख (प्राचार्य) आणि अभ्यासकेंद्र संयोजक यांच्या नावाचे राष्ट्रीयकृत बँकेत संयुक्त खाते असावे. खाजगी किंवा को- ऑपरेटिव बँकेत खाते उघडता येणार नाही. अभ्यासकेंद्राचे सर्व आर्थिक व्यवहार अभ्यासकेंद्र प्रमुख आणि संयोजक यांच्या स्वाक्षरीने करावे.

सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
(महाराष्ट्र शासनाने वर्ष १९८९ मध्ये स्थापिलेले)

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422 222
दूरध्वनी-(0253)2230106 (कार्या) 2231714/15,2230227, 2231478,
फॅक्स-2230106, मेल - dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac

**YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY**

Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik-422 222
Tel-(0253)2230106 (Off.) 2231714/15,2230227, 2231478, फॅक्स-2230106, Mail - dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac

WEB SITE : ycmou.digitaluniversity.ac

जा.क्र./यचममुवि/वि.कें.व्य./2020/ 303/194 | दिनांक : 14/09/2020

प्रती,
मा. प्राचार्य / केंद्रप्रमुख
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र
Smt. Sindhutai Jadhao Arts & Science Mahavidyalya
Janephal Road, Mehkar, 443301-443001

अभ्यासकेंद्र संकेतांक : 13102
प्रवेश क्षमता :25

**विषय : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या** HUMANITIES & SOCIALSCIENCES**विद्याशाखेच्या** M.Lib & I.Sc.(with Credits)-Distance Education-2000 Pattern(Marathi) **शिक्षणक्रमाच्या मान्यतेबाबत...**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना 1 जुलै 1989 रोजी महाराष्ट्र शासनाच्या कायद्यान्वये झालेली असून या विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त आहे हे आपणास ज्ञात आहेच.

आपल्या संस्थेने / महाविद्यालयाने अर्जामध्ये दिलेल्या तपशीलानुसार शैक्षणिक सुविधा, भौतिक सुविधा, शैक्षणिक व प्रशासकीय मनुष्यबळ आणि इतर सुविधांबाबत विभागीय केंद्रावरील छाणनी समितीने केलेल्या शिफारशीनुसार आपल्या संस्था / महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या अभ्यासकेंद्रावर M.Lib & I.Sc.(with Credits)-Distance Education-2000 Pattern(Marathi) या शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष 2020-2021 या एक वर्ष कालावधीसाठी संलग्नीकरण (Programme Affilation) देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारस संचालक, विद्यार्थी सेवा विभाग आणि संचालक, HUMANITIES & SOCIAL SCIENCESविद्याशाखा यांच्या शिफारशीसह अंतिम मान्यतेसाठी मा. कुलगुरू यांच्याकडे पाठविण्यात आलेली होती. मा. कुलगुरू यांनी आपल्या अभ्यासकेंद्रस उपरोक्त शिक्षणक्रमाचे संलग्नीकरण देण्यास मान्यता दिलेली आहे.

**आपणास कळविण्यात येते की, कोविड-19 च्या प्रादूर्भावामुळे आपल्या संस्थेची / महाविद्यालयाची प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी करण्यात न आल्यामुळे आपल्या संस्थेस / महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष सन 2020-2021 या एक वर्षासाठी वरील शिक्षणक्रमासाठी एमओयू (MOU) मध्ये दिलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून तात्पुते संलग्नीकरण (Provisional Programme Affilation) देण्यात येत आहे.**

आपल्या अभ्यासकेंद्राने या शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष 2020-2021 मध्ये केलेले कार्य व कोविड-19 चा प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर अभ्यासकेंद्र पाहणी समितीच्या अहवालावरून पुढील मान्यता देण्यात येईल. तसेच आपण आपल्या अभ्यासकेंद्रावरील मुक्त शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता राखून आपले अभ्यासकेंद्र एक उत्कृष्ट अभ्यासकेंद्र म्हणून नावलौकिकास येईल, यासाठी प्रयत्न करावे. **आपल्या अभ्यासकेंद्राच्या पुढील वाटचालीसाठी विद्यापीठाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा !**

Wadekar 17/09/2020
(डॉ. नागार्जुन वाडेकर)
प्र. संचालक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्र विद्याशाखा

(डॉ. प्रकाश देशमुख)
प्र. संचालक
विद्यार्थी सेवा विभाग

**प्रत माहितीसाठी :**

(1) संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्र विद्याशाखा
(2) विभागीय संचालक / वरिष्ठ शैक्षणिक **AMRAVATI** विभागीय केंद्र यांना उचित कार्यवाहीसाठी
(3) परीक्षा नियंत्रक यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी (4) प्रमुख, संगणककक्ष (5) वित्त विभाग यांना माहितीसाठी

सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
(महाराष्ट्र शासनाने वर्ष १९८९ मध्ये स्थापिलेले)

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422 222
दूरध्वनी-(0253)2230106 (कार्या) 2231714/15,2230227, 2231478, फॅक्स-2230106, मेल - dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac

**YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY**
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik-422 222
Tel-(0253)2230106 (Off.) 2231714/15,2230227, 2231478, फॅक्स-2230106, Mail - dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac
WEB SITE : ycmou.digitaluniversity.ac

जा.क्र./यचममुवि/वि.कें.व्य./2020/3।।)19६ दिनांक : 14/09/2020

प्रती,
मा. प्राचार्य / केंद्रप्रमुख
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र
Smt. Sindhutai Jadhao Arts & Science Mahavidyalya
Janephal Road, Mehkar, 443301-443001

अभ्यासकेंद्र संकेतांक : 13102
प्रवेश क्षमता :60

**विषय : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या** COMM.& MGMT**विद्याशाखेच्या** M.Com(English) **शिक्षणक्रमाच्या मान्यतेबाबत...**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना 1 जुलै 1989 रोजी महाराष्ट्र शासनाच्या कायद्यान्वये झालेली असून या विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त आहे हे आपणास ज्ञात आहेच.

आपल्या संस्थेने / महाविद्यालयाने अर्जामध्ये दिलेल्या तपशीलानुसार शैक्षणिक सुविधा, भौतिक सुविधा, शैक्षणिक व प्रशासकीय मनुष्यबळ आणि इतर सुविधांबाबत विभागीय केंद्रावरील छाणनी समितीने केलेल्या शिफारशीनुसार आपल्या संस्था / महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या अभ्यासकेंद्रावर M.Com(English) या शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष 2020-2021 या एक वर्ष कालावधीसाठी संलग्नीकरण (Programme Affilation) देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारस संचालक, विद्यार्थी सेवा विभाग आणि संचालक, COMM.& MGMTविद्याशाखा यांच्या शिफारशीसह अंतिम मान्यतेसाठी मा. कुलगुरू यांच्याकडे पाठविण्यात आलेली होती. मा. कुलगुरू यांनी आपल्या अभ्यासकेंद्रस उपरोक्त शिक्षणक्रमाचे संलग्नीकरण देण्यास मान्यता दिलेली आहे.

**आपणास कळविण्यात येते की, कोविड-19 च्या प्रादूर्भावामुळे आपल्या संस्थेची / महाविद्यालयाची प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी करण्यात न आल्यामुळे आपल्या संस्थेस / महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष सन** 2020-2021 **या एक वर्षासाठी वरील शिक्षणक्रमासाठी एमओयू** (MOU) **मध्ये दिलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून तात्पुते संलग्नीकरण** (Provisional Programme Affilation) **देण्यात येत आहे.**

आपल्या अभ्यासकेंद्राने या शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष 2020-2021 मध्ये केलेले कार्य व कोविड-19 चा प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर अभ्यासकेंद्र पाहणी समितीच्या अहवालावरून पुढील मान्यता देण्यात येईल. तसेच आपण आपल्या अभ्यासकेंद्रावरील मुक्त शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता राखून आपले अभ्यासकेंद्र एक उत्कृष्ट अभ्यासकेंद्र म्हणून नावलौकिकास येईल, यासाठी प्रयत्न करावे. **आपल्या अभ्यासकेंद्राच्या पुढील वाटचालीसाठी विद्यापीठाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा !**

(डॉ. पंडित पलांडे)
संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

(डॉ. प्रकाश देशमुख)
प्र. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग

**प्रत माहितीसाठी :**
(1) संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
(2) विभागीय संचालक / वरिष्ठ शैक्षणिक सल्लागारAMRAVATI विभागीय केंद्र यांना उचित कार्यवाहीसाठी
(3) परीक्षा नियंत्रक यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
(4) प्रमुख, संगणककक्ष (5) वित्त विभाग यांना माहितीसाठी